आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवा, तीच आपल्याला यशस्वी करते..!

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ११४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार १ फेब्रुवारी २०२५ | अंक५४ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## तुम्ही साधूवर आक्षेप घेता ही कोणती बुद्धी असावी

सध्या सर्वजण एकत्र येऊन धनंजय मुंडेंच्या मागे लागले-ले आहेत. मग त्या माणसाने किती आघात सहन करावे. गेल्यावेळीही आघात झाले. आताही आघात होतात. मनसिक आधार देणं हा वारकरी संप्रदायात गुन्हा मानला जात नाही. मी जर हत्येच समर्थन केले, आरोपीचं समर्थन केलं असतं तर तुमचं बोलणं योग्य होतं. आरोपीला फासावर चढवा, पण जो निर्दोष आहे त्याच्यासोबत बोललं तरी तुम्ही साधूवर आक्षेप घेता, म्हणजे ही कोणती बुद्धी असावी, असा सवालही त्यांनी उपस्थितीत केला.

# संतोष देशमुख यांच्या हत्येला पाठिंबा नाही महंत नामदेव शास्त्री

## मी वारकरी आहे. आम्ही प्राणी मारत नाही. आम्ही पाठिंबा देऊ असे तुम्हाला का वाटतं?

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे सध्या मराठवाड्यातील राजकारण तापलं आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने आंदोलन केले जात आहेत. त्यातच आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांना क्लीनचिट दिली आहे. धनंजय मुंडे हा खंडणी घेऊन जगणारा माणूस नाही. त्यांच्यासोबत मीडिया ट्रायल सुरू आहेङ्क असे विधान भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री म्हणाले. यानंतर यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यातच आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी मी संतोष देशमुख यांच्या हत्येला मी कधीही पाठिंबा दिलेला नाही, असे म्हणाले.

मी कधीही हत्येला पाठिंबा दिलेला नाही



नुकतंच भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी केलेल्या विधानाबद्दल सविस्तर भाष्य केले. ङ्कधनंजय मुंडेंची अवस्था आणि त्यांची मानसिकता याला मी आधार दिला. मी त्यांना हे सांगितलं की माझा त्यांना पाठिंबा आहे. संतोष देशमुख यांची जी हत्या झाली, यात जे कोणी आरोपी आहेत, त्यांना फाशी व्हावी यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री प्रयत्न करतात. यंत्रणा काम करते. न्यायालयीन व्यवस्था काम करतेय. यात नामदेव शास्त्री कुठे आहेत. मी कधीही हत्येला पाठिंबा दिलेला नाही. मी वारकरी आहे. आम्ही प्राणी मारत नाही. आम्ही शाकाहारी माणसं आहोत. माणूस मारल्यानंतर आम्ही त्याला पाठिंबा देऊ असे तुम्हाला का वाटतं? असा सवाल नामदेव शास्त्रींनी उपस्थित केला.धनंजय मुंडेंची आई आणि बाबा हे भगवान बाबांचे शिष्य आहेत. परंपरेने ते भगवान बाबांचे भक्त आहेत आणि एखादा भक्त जर भगवान गडावर आला आणि त्याने जर आशीर्वाद दिला तर त्याचे राजकारण करण्याइतपत कोती बुद्धी महाराष्ट्राची नसावी असे मला वाटतेङ्क, असेही नामदेव शास्त्री म्हणाले.हत्येचा आणि पाठिंब्याचा विषय वेगवेगळा

धनंजय मुंडे हे जेव्हा भगवान गडावर आले तेव्हा त्यांच्या हाताला सलाईनची सुई होती. त्यांना गडावर आल्यावर सलाईन लावलेली होती. ज्या माणसाचा चेहरा ५३ दिवसांपासून खराब झालेला आहे, त्याच्या हाताला सुई आहे, रक्त येतं, तरीदेखील एखाद्या संताने आशीर्वाद द्यायचा नाही ही कुठली वृत्ती आहे. हत्येचा आणि पाठिंब्याचा विषय वेगवेगळा आहे. ते भगवान गड मोठा करतात. हत्येला किंवा आरोपीला पाठिंबा दिला असता तर तुमचं म्हणणं बरोबर होतं असेही नामदेव शास्त्रींनी सांगितले.

## भोकर येथे विश्वकर्मा जयंती निमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

भोकर (प्रतिनिधी) विराट विश्वकर्मा प्रभू जयंतीनिमित्त भोकर येथे ३ ते १० फेब्रुवारी दरम्यान श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून कथा प्रवक्ते ह.भ.प.भागवताचार्य गजानन महाराज जुनगडे पैठण यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून कथा ऐकावयास मिळणार आहे. भोकर येथील म्हैसारोड लगत बांधण्यात आलेल्या विश्वकर्मा मंदिर कलशारोहण चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त श्रीमद् भागवत कथा सप्ताह आयोजित करण्यात आला असून सकाळी ४ ते ६ काकडा भजन, दुपारी १ ते ४ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते ११ कीर्तन होणार असून श्रीमद् भागवत कथेचे प्रवक्ते भागवताचार्य ह भ प गजानन महाराज जुनगडे हे राहणार आहेत रात्री कीर्तनाचे कार्यक्रम पुढील प्रमाणे ३ फेब्रुवारी रोजी ह. भ.प. स्वातीताई तुपेकर, ४ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. प्रतीक्षा दीदी आळंदीकर, ५ फेब्रुवारी रोजी ह भ प भुजंग महाराज रोडगीकर, ६ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. महाजन महाराज दगडवाडीकर, ७ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. महंत प्रभाकर बाबा कपाटे भोकर, ८ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज नांदेड ९ फेब्रुवारी रोजी ह. भ. प सुधाकर महाराज खैरगावकर , यांचे कीर्तन होणार असून १० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत समारोपीय काल्याचे किर्तन ह.भ.प.गजानन महाराज जुनगडे यांचे होणार आहे १२ वाजता श्री विश्वकर्मा प्रभूचा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे त्यानंतर महाप्रसाद होणार आहे या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन विश्वकर्मा मंदिर समिती, युवा मंडळ, महिला मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपात्रित पदभरती परीक्षा २ फेब्रुवारी ला होणार

### बीडमध्ये १४ उपकेंद्रावर ४४७९ परीक्षार्थी

बीड, दि. ३१ :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ दिनांक २ फब्रुवारी २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १४ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ४ हजार ४७९ उमेदवार बसलेले आहेत.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १४ उपकेंद्रप्रमुख १४ मदतनीस ६५ पर्यवेक्षक २१७ समवेक्षक असे एकूण ३१० अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हाप्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी समाज कल्याणच्या सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

१०० मीटर परिघात मनाई आदेश परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. पेपरच्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःच्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांच्या परीक्षा व उपकेंद्रावर परीक्षेकरिता सकाळी ८.३० वाजता उपस्थित राहावे. सकाळी १०.३० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणा-या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवास उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन



नवी दिल्ली, दि. ३०: नवी दिल्लीमध्ये होणा-या ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. दिल्लीत २१ ते २३ फब्रुवारी २०२५ दरम्यान होणारे साहित्य संमेलन यशस्वी होईल असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील साहित्य संमेलनासाठीच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते.याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, दिल्लीत होणारे हे साहित्य संमेलन निश्चित भव्य असे होईल. हे संमेलन देश नव्हे, तर जगभरातील मराठी माणसांकरीता अभिमानास्पद ठरेल. साहित्य संमेलनाचे आयोजन यशस्वी व्हावे यासाठी विविध यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे संमेलन दिल्लीत होणार असल्याने त्याला विशेष महत्व आहे. असून यासाठी महाराष्ट्र शासन पाठीशी असल्याचे, मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राजधानीत होणा-या साहित्य संमेलनाबाबत मराठी साहित्यिक उत्साही असून हे संमेलन विचारप्रवर्तक ठरेल असे सांगून या साहित्य संमेलनाकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित केल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. दिल्लीतील मराठी मंडळाच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा नागरी सत्कारदरम्यान, बुधवारी सायंकाळी दिल्लीतील विविध मराठी मंडळाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी दिल्लीत अनेक वर्षापासून राहत असलेल्या मराठी लोकांनी मुख्यमंत्री यांच्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. मुख्यमंत्री यांनी याबाबत सकारात्मकता दर्शविली असून दिल्लीतील मराठी मंडळांसाठी आणि येथील वास्तुंसाठी निश्चित योग्य ती पाऊले उचलली जातील असे आश्वासन दिले.

## भाषिक कौशल्य अंगीकृत केल्यास रोजगार निश्चितपणे मिळेल - राजकुमार यल्लावाड



प्रतिनिधी / पाटोदा मराठी भाषा कौशल्य अंगीकृत केल्यास संपूर्ण बेरोजगार तरुणांना मायबोली मराठी निश्चितपणे रोजगार देऊ शकते. तरुणांनी मराठी भाषेकडे त्या अंगांनी पाहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रोफेसर राजकुमार यल्लावाड यांनी केले. येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषिक पंधरवड्याचा समारोप करण्यात आला त्याप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर मराठी भाषा संचालनालयाचे मा. महेश लगड, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य नामदेव चांगण, मराठी विभागप्रमुख प्रोफेसर हमराज उईके यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रो. यल्लावाड यांनी मराठी भाषा कौशल्य आत्मसात केल्यानंतर अनुवादक, ब्लॉगलेखन, युट्युबर, दुभाषिक, मुद्रित शोधन अशा विविध क्षेत्रात कशा पद्धतीने रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते याचे सविस्तर विवेचन केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाराष्ट्र शासन, भाषा संचालनालयाच्या वतीने ३६ जिल्हे-३६ मार्गदर्शन सत्रे या उपक्रमांतर्गत मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधीफ या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यासाठी शासकीय अनुदान प्राप्त झाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांपैकी बीड जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी आमच्या महाविद्यालयास मिळाली याचा आम्हाला आनंद आहे.

# विवेकाची पेरणी करणाऱ्या प्राचार्या सविता शेटे आणि एकल महिलांचा आधारवड रुक्मिणी नागापुरे; सावित्रीच्या खऱ्या लेकी!- राजकुमार कदम, बीड

क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठान, पाटोदा समाज परिवर्तनासाठी झोकून दिलेल्या कार्यकर्त्यांच्या पाठीवर थाप मारून त्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्य सातत्याने करत असते. या प्रतिष्ठानचे अध्यक्ष कॉम्रेड एक्बाल पेंटर यांनी यांनी ही परंपरा अनेक वर्षांपासून जपली आहे. क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील यांचा सहवास लाभलेल्या या ऐंशी पार केलेल्या तरूणाची तडफ वाखाणण्याजोगी आहे. जानेवारी महिन्यात राष्ट्रमाता जिजाऊसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती असते. त्यानिमित्त पुरोगामी परिवर्तनवादी सामाजिक कार्यकर्ते आणि सावित्रीच्या लेकींचा सन्मान केला जातो. यावर्षी क्रांतिसिंह प्रतिष्ठान शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी विवेकाची पेरणी करणा-या प्राचार्य सविता शेटे यांना मनरेंद्र दाभोळकर प्रेरणा पुरस्कारफ आणि एकल महिलांचा आधारवड रुक्मिणी नागापुरे यांचा मसावित्रीबाई फुले समाज ज्योतीफ पुरस्कार देऊन सन्मान करत आहे. त्या निमित्त सावित्रीच्या या खऱ्याखुऱ्या लेकींच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न.- प्राचार्या डॉ. सविता शेटे:

प्राचार्य सविता शेटे हे नाव महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रास चांगलेच सुपरिचित आहे. बीड येथील माऊली विद्यापीठ,केज संचलित महिला महाविद्यालयाच्या त्या दीर्घकाळ प्राचार्य होत्या. १९८३ साली मुरूड येथे निदेशक पदा पासून त्यांनी शिक्षकी पेशास सुरवात केली. १९८६ ते १९९० पर्यंत शासकीय कला व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे होम सायन्स विषयाच्या प्राध्यापक म्हणून कार्य केल्या नंतर १९९० साली त्या बीड येथील महिला महाविद्यालयात प्राध्यापक तथा प्रभारी प्राचार्य म्हणून रूजू झाल्या. त्यानंतर १९९८ पासून ते २०२३ पर्यंत त्या या महाविद्यालयाच्या प्राचार्य होत्या. मधे एक वर्ष स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या डेप्युटी रजिस्टार म्हणुन त्यांनी कार्य केले. प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून काम करताना आपले नेमून दिलेले काम तर त्यांनी केलेच . विद्यार्थी-प्रिय अभ्यासू प्राध्यापक म्हणून त्या सुपरिचित होत्या. त्याचबरोबर देशाचे जबाबदार नागरिक घडविण्याकडे त्यांनी लक्ष दिले. विद्यार्थीनीं मधे मविवेकवादफ रुजविण्याचे त्यांनी कटाक्षाने प्रयत्न केले. सेवाकाळात सिनेट, नॅकसह विद्यापीठांशी संलग्न विविध समित्यांवर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. तिथे त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. राज्य व देश पातळीवरील विविध कॉन्फरन्स मधे भाग घेत त्यांनी अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण पेपर सादर केले. दशेत राष्ट्र सेवा दलाशी त्यांचा संबंध आला होता, तो त्यांनी आजतागायत कायम ठेवला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. बीड जिल्हाध्यक्ष पदा पासून ते अनिसच्या केंद्रीय कमिटी पर्यंत त्यांनी जबाबदाऱ्या पार पाडल्या. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक शहीद नरेंद्र दाभोळकर यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. विवेक वाहिनीच्या माध्यमातून त्यांनी शाळा महाविद्यालयांत अनेक उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांमधे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे जाणिवपूर्वक प्रयत्न या माध्यमातून करण्यात आले. होळीच्या वेळेस मकचऱ्याची होळी करा आणि होळीची पोळी दान करा!फ सारखे उपक्रम असतील किंवा प्रदूषणाचे तोटे पटवूनदेताना मफटाके मुक्त दिवाळीफ उपक्रम असेल. नागपंचमीवेळी सर्पविज्ञाना बद्दल शास्त्रशुद्ध माहिती! शाळा शाळां, महाविद्यालयांत जावून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याचा त्यांचा कार्यक्रम सुरूच असतो. त्याचवेळेस मजादूटोणाफ करून लोकांची फसवणूक करणाऱ्या मभोंदू बाबांफच्या पर्दाफाश करायलाही त्यांनी मागेपुढे पाहिले नाही.

त्यांच्या या मशैक्षणिकफ व मसामाजिकफ कार्याची दखल अनेक संस्थांनी घेत त्यांचा गौरव केला आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार, कर्तृत्ववान महिला सन्मान, आधारस्तंभ आदि वीस सामाजिक शैक्षणिक संस्थांनी प्राचार्य डॉ. सविता





शेटे यांना सन्मानित केले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठान ही त्यांच्या कामाची दखल घेत त्यांचा सन्मान करत आहे.

रुक्मिणी नागापुरे:-

क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठानने यावर्षी दखल घेतलेली दुसरी रणरागिनी आहे रुक्मिणी नागापुरे. एकल महिलांना संघटीत करून त्यांना स्वाभिमानाने जीवन जगण्याचे शिकवणारी ही सावित्रीची खरीखुरी लेक! जोडीदार इहलोकीची यात्रा मधेच सोडून गेल्या नंतर बहुतांश एकल महिला खचून जातात.त्यांना हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते. विधवाच केवळ एकल महिला नाहीत तर परितक्त्या, घटस्फोटित, पतीने सोडलेल्या, पतीला सोडलेल्या, प्रौढ कुमारिका अशा विविध प्रकारच्या हजारो महिला या प्रकारात येतात. आणि या महिलांचे प्रश्न समान आहेत.

वयाच्या सव्वीस सत्तावीसाव्या वर्षीच जोडीदार अकाली सोडून गेल्याने रुक्मिणी नागापुरे यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मागे दोन कच्छी बच्छी! रडत न बसता त्या परिस्थितीला भिडल्या. मुलांना शिकवत शिकवत त्यांनीही आपले शिक्षण पुढे सुरू केले. आयटीआय मधे इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन डिझायनिंगचे कोर्स केले. त्याच बरोबर उच्च शिक्षण घेत बी. ए. एम. ए. पर्यंतच्या पदव्याही त्यांनी मिळवल्या. एकल महिलांना प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर ऊभा करण्याचा विडाच त्यांनी उचलला. मराठवाड्यातील सुमारे तीन हजार महिलांना त्यांनी प्रशिक्षित केले.एकल महिलांना सासर माहेरची म्हणावी अशी साथ मिळत नाहीच. उपेक्षा, उपहासाचे जीने तीला जगावे लागते. स्वतः सक्षम झाल्या अशा समदुःखी महिलांना उपेक्षेच्या गर्तेतून बाहेर काढण्याचा निर्णय त्यांनी घेतल. एकल महिला संघटनेची त्यांनी स्थापना केली. अशा महिलांना संघटीत करण्यासाठी पायाला भिंगरी लावून त्यांनी फिरायला सुरवात केली.तालुक्या पासून सुरू केलेल्या कार्याचा परीघ त्यांनी वाढविण्यास सुरवात केली. मराठवाड्यातील चार जिल्ह्ऱ्यातील अकरा तालुक्यात त्यांनी आपले संघटन वाढवले आहे. चारशे बेचाळीस गावातील सुमारे वीस हजार महिलांना त्यांनी संघटनेशी जोडले आहेत. या संघटने मार्फत लोकशाही मार्गाने आंदोलने करून महिलांचे अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. एकल महिलेचे अनेक प्रश्न असतात. त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन तर विकृत असतोच परंतु अनेकदा कागदोपत्री विवाहाची नोंद नसते. आधार कार्ड, पॅन कार्ड नसते, रेशनकार्ड वर नाव नसते. पती निधनानंतर संपतीपासून तील बेदखल केले जाते. एकल महिलांच्या अशा समस्येवर मात करण्यासाठी त्यांनी एकल महिला सक्षमीकरणाचा लढा सुरू केला.

स्वावलंबी महिला निधी संघटनेचे अध्यक्ष म्हणूनही त्या काम करताहेत. या संघने मार्फत महापुरुषांच्या जयंत्या, संविधान दिन, मनुस्मृती दहन असे कार्यक्रम राबवले जातात. समाजातील अनिष्ट रूढींना छेद देत वैज्ञानिक दृष्टिकोन समजावून सांगितला जातो. संविधानिक मुल्ये, शिक्षणाचे महत्त्व पटवून देत महात्मा जोतिराव फुले यांच्या सावित्रीबाईचा वारसाच रुक्मिणीबाई चालवत आहेत. सावित्रीच्या या दोन्ही लेकींचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. सावित्रीच्या लेकींनी भिडेवाड्याकडे तोंड करावे यासाठी या दोघींही प्रयत्नशील आहेत. स्त्री पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आणि अंधश्रद्धा व पाखंडवादावर प्रहार हे या दोघींच्याही कामाचे समान सुत्र आहे. त्यांचा गौरव हा सावित्रीच्या खऱ्याखुऱ्या लेकिंचा गौरव आहे...

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

# शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुमार

देशभरातील ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मांडणारा ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट म्हणजे ङ्गअसरफ्चा १४वा अहवाल मंगळवारी प्रसिद्ध झाला. या अहवालातून राज्यातील ग्रामीण भागातील सरकारी शाळांमधील शिक्षणाचे भयाण वास्तव समोर आले आहे. राज्यातील ३३ जिल्ह्यांमधील ९८७ गावांमध्ये वय वर्षं ३ ते १६ मधील ३३ हजार ७४६ विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणात पूर्व प्राथमिक (वयोगट ३-५), प्राथमिक (वयोगट ६-१४) आणि मोठी मुले (वयोगट १५-१६) या गटांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. त्यात, राज्यातील सरकारी प्राथमिक शाळांमध्ये ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांचा टक्का दिवसेंदिवस घसरत असल्याची बाबही दिसून आली आहे. २०२२च्या तुलनेत २०२४ मध्ये तब्बल साडेसहा टक्क्यांनी विद्यार्थी संख्या घटल्याची महत्त्वपूर्ण आकडेवारी समोर आली आहे, ही चिंताजनक बाब आहे. २०१९च्या कोरोना काळानंतर विद्यार्थी संख्या घटत असल्याची प्रक्रिया सुरू झाली होती. त्यामुळे सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्याची पालकांची मानसिकताच नसल्याची धक्कादायक माहिती असर संस्थेच्या अहवालात नमूद आहे. याउलट आयसीएससी, सीबीएससी या केंद्रीय बोर्डाचे शिक्षण चांगले आहे, असा मानणारा मोठा पालक वर्ग तयार झाला आहे. त्यामुळे, महाराष्ट्र राज्याच्या एसएससी बोर्डाचे शिक्षण हे येत्या काही वर्षांत कितपत स्पर्धेत टिकेल, यावरून वेगळी चर्चा ऐकायला मिळत आहे. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याबरोबर त्या शिक्षणाचा दर्जा राखला जावा ही सरकारची जबाबदारी आहे. देशाच्या राज्य घटनेत तशी तरतूद आहे; परंतु ग्रामीण भागातील शाळांच्या पायाभूत सुविधांबरोबर गुणवत्तेबाबत सरकारी पातळीवर उदासीनता दिसून येते. खरं तर सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा या तर भारतीय शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा आहे. याच शाळांनी खऱ्या अर्थाने देशात आणि राज्यात शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविले आहे. शाळांच्या सुविधांचा कायापालट करण्याबरोबर शाळेमध्ये उत्तम शिक्षणासाठी शिक्षकांची उपलब्धता फार महत्त्वाची आहे, याकडे सरकारने लक्ष द्यायला हवे. शैक्षणिक गुणवत्तेचा विचार केला तर राज्यात इयत्ता ८वी मधल्या २५ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या इयत्तेतील उतारा वाचता येत नव्हता. त्याशिवाय आठवीच्या ४० टक्के विद्यार्थ्यांना वजाबाकी व भागाकार ही आकडेमोड करणे शक्य होत नव्हते, हे भीषण वास्तव यानिमित्ताने समोर आले. दुसऱ्या बाजूला मात्र, इयत्ता ८वीतील खासगी शाळेतील मुले सरकारी शाळेतील मुलांपेक्षा भागाकारात चांगली कामगिरी करत असल्याचे दिसून आले. अक्षर ओळख या निकषावर इयत्ता पहिलीतल्या २६ टक्के विद्यार्थ्यांना एकही अक्षर ओळखता येत नाही. एवढेच कशाला तर इयत्ता आठवीतील १ टक्के विद्यार्थी एकही अक्षर ओळखू शकले नाही, तर साडेसहा टक्के विद्यार्थ्यांना शब्दांची ओळख असली, तरी पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेच्या पातळीचे उतारेही त्यांना वाचता आले नाहीत. १४ टक्के विद्यार्थी जेमतेम पहिल्या इयत्तेपर्यंतचा उतारा वाचू शकले, तर ७४.२ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या इयत्तेचा उतारा वाचता आला. राज्यातील सरकारी शाळांमधील तिसरी ते पाचवीच्या ५०% विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तकही वाचता येत नाही, हे वास्तव या अहवालाच्या रूपाने पुढे आले. जिल्हानिहाय शालेय शिक्षणाची स्थिती यामध्ये मुख्यत्वे अंकगणित, अक्षर ओळख, वाचन त्यासोबतच डिजिटल शिक्षण या सगळ्यांची सद्यस्थिती आकडेवारी या सर्वेतून मांडली गेली आहे. मात्र, विद्यार्थ्यांना स्मार्टफोन हा आता आपल्या आयुष्याचा एक भाग वाटत आहे, त्याचा सोशल मीडियामधील सहभाग वाढला आहे, असे चित्र आपल्याला दिसते. त्याचे प्रतिबिंब या अहवालात दिसले. १४ ते १६ वयोगटातील ९४ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी स्मार्टफोन आहेत. त्यापैकी ७० टक्के विद्यार्थी ते स्मार्टफोन चाचणीसाठी आणू शकले. १९ टक्के विद्यार्थ्यांकडे स्वतःचा स्मार्टफोन आहे. यापैकी ६३ टक्के विद्यार्थी शैक्षणिक कामांसाठी स्मार्टफोन वापरतात, तर ७२ टक्के विद्यार्थी सोशल मीडियावर सक्रिय राहण्यासाठी स्मार्टफोन वापरतात असे दिसून आले आहे. विद्यार्थ्यांच्या हातात स्मार्ट फोन असताना, ते त्याचा वापर नक्की काय पाहण्यासाठी करतात, यावर ना पालकांचे नियंत्रण, ना शिक्षकांचे. त्यामुळे अल्पवयीन मुलांकडील मोबाईल हे त्याच्या आयुष्यासाठी घातक ठरते आहे का, हे तपासण्याची यंत्रणा नाही, हे सत्य स्वीकारायला हवे. तसेच महाराष्ट्र राज्य हे शिक्षणात अग्रेसर म्हणतो, ते फक्त आता कागदावर राहिले नाही. महाराष्ट्रापेक्षा मागे असलेल्या मेघालय, जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि तामिळनाडूसारख्या राज्यांनी शिक्षणात सुधारणा केली असल्याचे अहवालातून उघड झाले आहे. आता या अहवालानंतर पालकवर्ग मुलांना शाळेत का पाठवतो, वरच्या वर्गात जाऊनही, लिहिता-वाचता न येणाऱ्या मुलांचे काय होणार? अर्धशिक्षित पिढी आपण निर्माण करत आहोत का? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने निर्माण होत आहेत. हा दोष पालकांचा, शिक्षकांचा की शिक्षणव्यवस्थेचा आहे, हा सुद्धा चर्चेचा विषय होऊ शकतो; परंतु विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी जी तत्परता राज्य सरकारने दाखवली तीच तत्परता राज्यातील ग्रामीण भागात शिकणाऱ्या मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी दाखविण्याची गरज आहे

# मराठीत बोललेलं कळत नाही...हिब्रुत सांगू ?

### मराठीमभाषामसंवर्धन

मराठी भाषा ही अभिजात भाषा आहे. असे जाहीर करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपला प्रजासत्ताक दिनाच्या संदेशातही याचा उल्लेख केला याचा प्रत्येक मराठी भाषक व्यक्तीला अभिमान आहे . भाषा संवर्धनासाठी आता यापुढील काळात मराठी भाषकांना पुढाकार घ्यावा लागणार हे देखील स्पष्ट आहे.

देशात संपर्क भाषा म्हणून हिंदी तसेच इंग्रजीचा वापर अधिक होतो, या पार्श्वभूमीवर आपण किमान आपल्या राज्यात मराठीचा संपर्क भाषा म्हणून वापर व्हावा यासाठी आग्रही रहायला पाहिजे.

आज महाराष्ट्रात नागपूर, छत्रपती संभाजीनगर सारख्या शहरात घराबाहेर पडल्यावर मराठी ऐवजी हिंदीचा वापर करणारे बहुसंख्य आहेत. या सर्वांना आपण आग्रहपूर्वक मराठीचा वापर करा असे सांगितले पाहिजे.

आजकाल जगभरात कृत्रिम बुद्धीमत्ता अधिक वापरली जात आहे. यात मायक्रोसॉफ्ट तसेच लहरीं ऋझढ आधारे आपण इंग्रजीतून मराठीत भाषांतर सहजरित्या करू शकतो. यातच पुढचे पाऊल अगदी अनपेक्षित वाटलं तरी चीन सारख्या देशानं टाकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिलाय. चीन मध्ये मंडारिन भाषा बोलली जाते आणि जागतिक स्तरावर सर्वाधिक भाषा म्हणून याच भाषेची ओळख आहे.

चिनी माणसं आपल्या भाषेबाबत आग्रही असले तरी कृत्रिम बुद्धीमत्तेव्दारे संपर्क सूत्र स्थापित करताना त्यांनी मराठीला प्राधान्य दिले आहे. चीनच्या कृत्रिम बुद्धिमत्ता सहाय्यक अर्थात अख असिस्टंट एप्लीकेशन झळाळ-रळ व्दारे त्यांनी मराठीला प्राधान्य देऊन इंग्रजी भाषेतून मराठीत भाषांतराची सुविधा सुरू केली आणि विशेष म्हणजे या दोन्ही भाषा चीनच्या नाहीत.

मराठी भाषा संवर्धन आणि प्रसार याबाबत आपण आताच पावले उचलली पाहिजेत. जागतिक स्तरावर सर्वाधिक वापर होणा-या भाषांमध्ये मराठी १३ व्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रातच मराठीचा वापर होतो असे नाही तर गोवा, कर्नाटक, तामीळनाडू, तेलंगाना, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, दादरा आणि नगर हवेली तसेच दमण आणि दिव या राज्य व केंद्र शासीत प्रदेशात मराठी भाषा बोलणारे आहेत.

आपल्या लगतचे पर्यटकांचे आवडते राज्य म्हणजे गोवा. या राज्यात मराठी ही दुसरी अधिकृत राज्यभाषा आहे. हे आपणास माहिती नसेल कदाचित. गोव्यात आपण मराठीत बोलत असाल तर आपल्या स्वतःच्या राज्याप्रमाणे समोरील व्यक्ती मराठीतच बोलणार ही स्थिती आहे.

मराठीबाबत काही बाबी आपण जाणून घेतल्या पाहिजेत. मराठीचा मुळ विस्तार इन्डो-युरोपियन भाषेपासून सूरू झाला. त्याचा प्रवास पुढील काळात इन्डो-इराणी नंतर इन्डो आर्यन, सदर्न (दाक्षिनात्य) मराठी- कोकणी आणि मराठी असा झाला.

मराठीचे सध्याचे रूप हे मराठी प्राकृत भाषेतून आले आहे. मराठी भाषेसाठी देवनागरी लिपीचा वापर होतो. याचं मुळ संस्कृत भाषेत असून हिंदी भाषेतही याच लिपीचा वापर होतो.

मराठा साम्राज्य कालावधीतन पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावले.... असे आपण म्हणतो. याचा अर्थ सध्या अफगाणिस्तान मध्ये असलेल्या अटकपर्यंत मराठा साम्राज्य विस्तारलेले होते. त्यामुळे बलुचिस्थान मध्ये वसलेले मराठी बोलतात. तसेच या साम्राज्य विस्तारात ग्वाल्हेर, झासी, सुरत, बडोदा, हैदराबाद आदी ठिकाणी मराठी भाषक स्थायिक झाले व मराठी भाषा तेथे पोहोचली आणि स्थिरावली.

दक्षिण भारतात देखील तामिळनाडूतील तंजावर आणि केरळ मधील कासरगोड मध्ये या आधीच्या काळात मराठी भाषा स्थिरावलेल्या आहेत असा इतिहास आहे.

आज जगात मराठी माणूस नोकरी व व्यवसाय यासाठी सातासमुद्रापार वेगवेगळ्या देशात पोहोचला आहे. त्यामुळे अमेरिका, जर्मनी, ब्रिटन यारख्या देशांमध्ये मराठी भाषकांचे मंडळ बनवून मराठीचे संवर्धन होताना आपल्याला दिसते. महाराष्ट्र मंडल, मराठी मंडळे याकामी मोलाचा वाटा उचलत आहेत.

महाराष्ट्र हे पूर्ण मराठी भाषकांचे राज्य आहे. भाषावार प्रांतरचनेत १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झालेली आहे. यासाठीच आपण दरवर्षी महाराष्ट्र दिन साजरा करीत असतो.

राज्यात मराठी भाषा विभिन्न प्रांतात वेगवेगळ्या लहजात बोलली जाते. त्यावरून मराठी भाषेचे उपप्रकार आपल्याला सांगता येतात. त्यात मुख्य प्रकार विदर्भात आहेत. विदर्भ हा पूर्वी सेन्ट्रल प्रॉव्हीन्स अर्थात सी.पी अँन्ड बेरार चा भाग होता. ज्याची राजधानी नागपूर होती. त्या भागात झाडीबोली आणि व-हाडी मराठी असे प्रकार आहेत.

राज्यात मराठवाडा भागात मराठवाडी बोली तर धुळे-जळगाव भागात खान्देशी मराठी आहे. पुण्याची पुणेरी आणि मुंबईची आधीची बम्बईया आणि आताची मुंबैया मराठी असे ठोबळ उपप्रकार सांगता येतात.

तंजावर, तामीळनाडूत स्थिरावलेली मराठी ही दखनी मराठी म्हणून ओळखली जाते.

तर इस्राएल देशात जुदाव मराठीचा वापर होतो. वंशाने ज्यू पण मराठी भाषा वापरणारे इस्राएल मध्ये आहेत. त्या मोजक्या समुदायाची ही भाषा पण ती मराठीच आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर लिखाण हे देवनागरी लिपीत सापडते.

इस्रायल मध्ये हिब्रुचा वापर होतो पण काही हिब्रु भाषेतील साहित्यासाठी देवनागरीचा वापर झालेला आहे. इस्राएल मधील बेने समुदाय ही मराठी वापरतो यातील काही कुटुंबे मुंबईत देखील आहेत.

आपणाकडे आपण गंमतीने म्हणतो मी काय हिब्रूत बोललो का तुला, त्यामागचा मराठीचा संदर्भ आपल्यापैकी बहुतेक जणांना माहिती नाही. मराठी आणि हिब्रुचा नेमकेपणाने सदर्भ देखील आपल्याला माहिती असायला हवा.

संवर्धन अर्थात सांभाळणे याच जोडीला आता प्रचार - विस्तार झाल्यास मराठी टक्का नक्कीच वाढेल...!

प्रशांत विजया अनंत दैठणकर

जिल्हा माहिती अधिकारी
बीड
चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

# भगवानगड भक्कमपणे धनंजय मुंडेंच्या पाठीशी-महंत डॉ. नामदेव शास्त्री

पाथर्डी/भगवानगड - धनंजय हा जनतेचा सेवक म्हणून काम करणारा तरुण आहे. दोन पिढ्यांपासून मुंडे कुटुंबीय भगवानगडाचे निस्सीम भक्त आहेत. मुंडेंचे राजकीय व सामाजिक आयुष्य, त्यांनी आजवर केलेले काम पाहिल्यास लक्षात येते की आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्यांना संघर्ष आणि आरोप - प्रत्यारोपांना सामोरे जावे लागले आहे. आज भगवानगडावर दर्शनाला आला तेव्हा सुध्दा त्याच्या हाताला सलाईन लावलेले आहेत. धनंजयचा बीड हत्या प्रकरणात कसलाही संबंध नाही हे स्पष्ट आहे. कुणाकडे खंडणी मागून जगणारा तो माणूस नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. या प्रकरणात गुन्हेगार असलेल्या आरोपींचे कुणीही समर्थन करू शकत नाही, मात्र याआडून धनंजयला जाणीवपूर्वक बदनाम करून अडचणीत आणले जात आहे, या परिस्थितीत भगवानगड भक्कमपणे धनंजय मुंडेंच्या पाठीशी उभा आहे, असे प्रतिपादन गडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांनी केले आहे. मंत्री धनंजय मुंडे हे गुरुवारी



रात्री भगवानगड येथे दर्शनासाठी मुक्कामी आले होते. त्यानंतर आज सकाळी त्यांनी पुन्हा गडावर संत भगवानबाबा यांच्या समाधीचे दर्शन घेऊन विधिवत पूजन केले. दरम्यान महंत डॉ नामदेव शास्त्री यांनी यावेळी माध्यमांशी संवाद साधला. बीड जिल्ह्यात घडलेले हत्याकांड हे अत्यंत दुर्दैवी होते, ते कोणत्या कारणांनी घडले हे तपासले गेले पाहिजे. मात्र त्या घटनेच्या आडून सामाजिक सुरक्षेची जबाबदारी असलेल्या लोकप्रतिनिधी आणि माध्यमांनी या प्रकरणात मीडिया ट्रायल करून धनंजय मुंडेना आरोपी म्हणून नाहक बदनाम करत एक वेगळीच प्रतिमा निर्माण केली. त्याचबरोबर राजकीय लोकांनी त्यांचे राजकीय व वैयक्तिक विषय डोळ्यासमोर ठेऊन या प्रकरणाच्या आडून सामाजिक सलोखा बिघडवला असे मत व्यक्त करत महंत डॉ. नामदेव शास्त्री यांनी संबंधित पुढाऱ्यांची कानउघडणी केली आहे. दरम्यान धनंजय मुंडे यांनी गडाचा निरोप घेण्याआधी आज सकाळी पुन्हा एकदा ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा यांच्या समाधीचे तसेच महंत गुरुवर्य डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांचे दर्शन व आशीर्वाद घेतले. मी भगवानगडाचा एक निस्सीम भक्त आहे. भगवानगड, येथील ऐश्वर्य हे अठरा पगड जातीतील कष्टकरी वर्गाच्या एक एक रुपयाने निर्माण झालेले आहे. इथे संत ज्ञानेश्वर महाराजांचे, संत भगवानबाबा यांचे विचार शिकवले जातात. हे विचार मला राजकीय व सामाजिक आयुष्यात काम करताना प्रेरणा व ऊर्जा देण्याचे काम करतात. आज महंत डॉ नामदेव शास्त्री महाराज यांच्या सान्निध्यात गडाच्या आशीर्वादाने एक नवी ऊर्जा, शक्ती आणि बळ घेऊन जात आहे, आशीर्वादाची ही शिदोरी व गडाचा पाठिंबा माझ्यासाठी खूप अनमोल आणि तितकीच जबाबदारीची जाणिव करुन देणारा आहे. महंतांनी आणि गडाने माझ्यावर व्यक्त केलेला विश्वास माझ्यात अधिक आत्मविश्वास वाढवणारा असून यापुढे सामान्य लोकांसाठी अधिक जोमाने काम करत राहणार आहे, असे मत यावेळी धनंजय मुंडे यांनी बोलताना व्यक्त केले

# संत महंत समाज घडवणाऱ्या न्याय मंदिराकडून आरोपींचं समर्थन हे राज्याचं मोठं दुर्दैव!

जालना - संत महंत समाज घडवणारे एक न्याय मंदिर आहे. भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री असे काही बोलले असतील असे मला वाटत नाही. किंबहुना त्यांना दोष देऊन चालणार नाही. जाणाऱ्याने सांगितले असेल की असा म्हणा म्हणून. कारण ते एक मोठं श्रध्दा स्थान आहे. खंडण्याबद्दल ते बोलतील असे मला वाटत नाही. तसेच जो व्यक्ती त्या ठिकाणी गेला आहे त्याला कुठे कुठे हात पसरावे हे कळत नसावं. विकृतपणे केलेल्या कामाला समाज पाठीशी घालत नाही. तसेच वंजारी समाजाला ही हे मान्य नाही. मात्र असे खरंच असेल तर आरोपींचं समर्थन, हे राज्याचे मोठं दुर्दैवी आहे. शेवटी महंत हे महंत असतात. या कृत्याला जर कोणी समर्थन देत असेल तर ते समर्थन हे गुंडगिरीला प्रोत्साहन देणारे ठरेल. ते असे बोलले असतील तर भयंकर आहे. यात राज्याची मोठी हानी आहे. खून केल्याचा आंनद आणि गुन्हेगार यांना सोडून द्या, असा त्याचा अर्थ होत असल्याची टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. भगवान गडाचे महंत नामदेवशास्त्री यांनी शुक्रवारी सकाळी एक पत्रकार परिषद घेत आपण धनंजय मुंडे यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे आहोत, असा संदेश दिला. आजपर्यंत भगवान गडाचा राजकीय कारणासाठी वापर करु न देणाऱ्या नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे यांना पाठिंबा दिल्यामुळे त्याचे अनेक अर्थ काढले जात आहेत. दरम्यान या प्रकरणावर भाष्य करत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. या वक्तव्यामुळे संप्रदायवर परिणाम होण्याचं काही काय कारण. गुंड हे संप्रदाय चालवत नाही. ते काही बोलले असतील तर दुरुस्त करतील. त्यांना उगाच बोलवायला लावले आहे. कारण महंत खमके आहेत, ते असे बोलले असतील तर दुरूस्ती करतील. कदाचित त्यांना एक बाजू सांगितली असेल म्हणून



ते बोलले असतील. दरम्यान महंत नामदेवशास्त्री यांच्यावर दबाव असेल असा मला विश्वास बसत नाही. मात्र ते असे बोलले असतील तर हे भयंकर आहे. यात राज्याची मोठी हानी आहे. खून केल्याचा आंनद आणि गुन्हेगार यांना सोडून द्या, असा त्याचा अर्थ होतो असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## संकटाच्या काळात भगवान गड माझ्या पाठिशी – धनंजय मुंडे

हा गड माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभा आहे. याच्यासारखी दुसरी ताकद, शक्ती नाही. न्यायाचार्यांनी गडाचा विश्वास माझ्या पाठिशी उभे करणे ही खूप मोठी ताकद आणि जबाबदारी आहे. संकटाच्या काळात भगवान गड माझ्या पाठिशी उभा राहिला आहे. या शक्तीचं वर्णन मी शब्दांत करु शकत नाही, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले. या संकटातून बाहेर पडून जनतेची सेवा करणे, हेच माझे ध्येय आहे. राजकीय वर्तुळात लोक अशी चर्चा करत आहेत की, पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे या दोघांना मंत्रीपद मिळालं आहे, तर काहीतरी केले पाहिजे, असा काहींचा प्रयत्न असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले

## धनंजय मुंडे वातावरण दूषितकरताहेत – मनोज जरांगे पाटील

या प्रकरणात माणसाला मारून टाकले, त्याच्या रक्ताची माया दया नाही का? तुमच्यावर फाशीची वेळ आली म्हणून बाबाजी यांचा आसरा घेण्यासाठी गेले. पूर्वी दुःख देणारे हेच का मग, हीच का ती टोळी. बाबाजी यांना तुम्ही यात ओढत आहात. किंबहुना धनंजय मुंडे वातावरण दूषित करत आहेत. हा धक्कादायक विषय आहे. न्यायची अपेक्षा न करणे आणि गुंड सांभाळणे असा त्याचा अर्थ आहे. यात बाबाजीची सल गुंडांना येणार नाही. हे प्रकरण वेगळ्या दिशेने चालले आहे. यातून राज्यात भयंकर मॅसेज जाणार आहे. असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले

## पिंपळनेर जि.प.च्या प्रणव शिरसाटची विज्ञान प्रयोगाची राज्यस्तरावर निवड

पिंपळनेर : २० जानेवारी ते २२ जानेवारी या कालावधीत सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव जि बीड या ठिकाणी आयोजित जिल्हास्तरीय प्रदर्शन पी एम श्री जि.प.मा.शा पिंपळनेर घवघवीत यश संपादक केले. या शाळेचा प्रयोगाचे जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला व सदर प्रयोगाच्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन निवड झाली. यामध्ये चि. शिवराज विष्णू आजबे चि. प्रणव आनंद शिरसाट या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या निवडी बद्दल शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. शालेय व्यवस्थापन समिती व पिंपळनेर ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामसभेमध्ये मोठा नागरी सत्कार करण्यात आला. सदरील विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिक जनरेटर उपकरणं मध्ये सहभागी झाले होते. त्यांचे विज्ञान शिक्षक श्री निळकंठ डी. आर व श्रीमती शेलार जे एम यांनी मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन हे दि २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती या ठिकाणी संपन होणार आहे. शाळेच्या यशस्वी बद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री साळवे सर, केंद्रप्रमुख श्री सारडा सर, शाळेचे व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री गोरख नाना कांडेकर व समितीचे सर्व सदस्य ग्रामस्थांच्या वतीने सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन शुभेच्छा देण्यात आल्यात्यामुळे यंदा गतवर्षी पेक्षा अधिक अर्ज दाखल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्याच बरोबर ही मुदत वाढ अंतिम असेल तेव्हा पालकांनी जास्तीत जास्त अर्ज करावेत




प्रमिला देवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनुर येथे माजी विद्यार्थी मेळाव्याच्या अनुषंगाने दैनिक बीड माऊली चे मुख्य संपादक अभिजीत पवार यांचे इंग्रजी विभागात उपस्थित राहिल्या प्रसंगी इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक दत्ता रामरुले सर आणि हिंदी विभाग प्रमुख प्राध्यापक मुजावर सर यांनी स्वागत केले..

## डॉ.बांडगेवर महिलेचा लैंगिक अत्याचार केल्याने गुन्हा दाखल

माजलगाव-( प्रतिनिधी) येथील छत्रपती संभाजी चौक येथे टव-ाणी कॉम्प्लेक्स मध्ये डॉक्टरचा व्यवसाय करणाऱ्या करणाऱ्या डॉक्टर मोहन बांडगेवर एका महिलेवर लैंगिक अत्याचार केला म्हणून माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे ३७६ चा गुन्हा दाखल झाला आहे याबाबत अधिक माहिती अशी की माजलगाव शहरातील मंजरथ रोड या भागांमध्ये राहणाऱ्या एका महिलेवर

लैंगिक अत्याचार करण-ारा आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून मिरवणाऱ्या डॉक्टर मोहन बंडगे लां २५/ १ /२०२५ रोजी माजलगाव शहर पो-लीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून पीडित महिलेच्या तक्रारीवरून त्या आरोपी मोहन बांडगे ला दिनांक २९/ १/ २०२५ रोजी पिंक पथका-चे प्रमुख महेश भोसले यांनी त्यांच्या पथकासह अटक करून कोर्टासमोर हजर केले असता सुरुवातीला त्याला एक दिवस-ाची पोलीस कस्टडी देऊन पी सी आर संपल्याच्या नंतर आज दिनांक ३१जानेवारी २०२५ रोजी माजलगाव न्यायालयात हजर केले असता त्या आरोप-ीस १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे या कामी माजलगाव शहर पो-लीस स्टेशनचे सहाय्यक पो-लीस निरीक्षक भोसले व पो-लीस कॉन्स्टेबल गोरे पोलीस कॉन्स्टेबल घुले मॅडम व चालक सांगळे हे यांच्या पिंक पथकाने पोलीस अधीक्षक नवनीत कावत चेतना तिडके मॅडम अतिरिक्त पोलीस अधीक्षक धीरज कुमार यांच्या मार्गदर्शनाखा-ली व माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रा-हुल सूर्यवंशी यांच्या सूचनेवरून कारवाई केली.

# माजी महसूल राज्यमंत्री आ. सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त २५०० स्कूल बॅगचे वाटप.- राजु भैया जाधव

### इन्फंट इंडिया येथील विद्यार्थ्यांना भोजन व गोशाळेला चारा वाटप

पाटोदाः प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे माजी म हसूल राज्यमंत्री आ सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा येथे विविध सामाजिक उपक्रम राबवुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे असे आयोजक नगराध्यक्ष राजु भैया जाधव यांनी माहिती देवून उपस्थित राहण्याचे आवाहन केले.आ सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा येथे दि १ रोजी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना २५०० स्कूल बॅगचे वाटप करण्यात येणार आहे. इन्फ्रंट इंडिया,



पाली येथील विद्यार्थ्यांना भोजन तसेच गोशालेला चारा व पत्रे वाटप, पंतप्रधान आवास योजना शुभारंभ (शहरी २.०) आदी कार्यक्रमाचे आयोजन हायस्कूल शाळा पाटोदा येथे शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात आले आहे.मा. सागर आप्पा धस युवा नेते यांच्या शुभहस्ते पाटोदा शहर व पाटोदा नगरपंचायत हद्दीतील ५ वाड्या आणि वस्त्यावरील जिल्हा परिषद शाळा येथील विद्यार्थ्यांना २५०० स्कूल बॅग चे वाटप करण्यात येणार आहे. गोशाळेत पशुंसाठी चारा व पशुंच्या निवा-यासाठी पत्रे वाटप, बारगजे सर यांच्या इन्फंट इंडिया पाली येथील विद्यार्थ्यांना भोजन, पंतप्रधान घरकुल आवास योजना (शहरी २.०) शुभारंभ असे आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तरी या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, गणप्रमुख गटप्रमुख, नगरपंचायत उपनगराध्यक्ष, गटनेते, सभापती, सर्व नगरसेवक, माझी माझी पदाधिकारी शिक्षक व मुख्याध्यापक यांची प्रमुख उपस्थिती असून आपण सर्वांनी आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नगराध्यक्ष राजु भैया जाधव यांनी केले आहे.

# वाळु तस्करांची हुजरेगिरी करणे पडले महागात; दोन पोलीस कर्मचारी निलंबीत.!

गेवराई प्रतिनिधी पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतर ही काही पोलीस कर्मचारी अवैध धंद्याशी लागेबांध ठेवून आर्थिक उलाढाल करत आहेत. यात गेवराई पोलीस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांनी वाळूतस्कराशी हुजरे गिरी करुण करून आपला आर्थिक फायदा साधल्याने पोलीस अधिक्षकांनी या दोघांवर निलंबनाची कारवाई केली. त्यामुळे पुन्हा एकदा गोदापट्टा चर्चेत आला आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी यापूर्वीच गोदापात्रातील तिपाले नावाच्या कर्मचाऱ्याची बदली करून आपल्या भूमिका स्पष्ट केल्या होत्या.तसेच वाळू तस्करी रोखण्यासाठी ठोस पाऊले उचलण्या संदर्भात सूचना केल्या होत्या. गेवराई पोलीस ठाण्यातील बलराम सुतार (सहाय्यक फौजदार) आणि अशोक हंबर्डे (पोलीस हवालदार) या दोन कर्मचाऱ्यांनी वाळूच्या दोन टॅक्टरवर कारवाईचे आदेश असताना वाळूसह गाडी न ताब्यात घेता फक्त वाहन ठाण्यात आणून लावले आणि गुन्हा दाखल करण्यासाठी वेळ काढूपणा करत आरोपींना साथ देण्याचे काम केले.त्यामुळे पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी थेट गुरुवारी रात्री बलराम सुतार आणि अशोक हंबर्डे या दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन केल्यामुळे गोदापात्रात खळबळ उडाली. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक न राहणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निलंबनाचा मोठा इशारा एसपींनी या कारवाईच्या निमित्ताने जिल्हाभर दिला आहे.

**शहरात अवैध धंदे सर्रास सुरु?**

गेवराई शहरात मटका, जुगार, गुटका, धाब्यावर दारुची अवैध विक्री सर्रास सुरु आहे त्यामुळे तालुक्यात वाळु तस्करासह अवैध धंदे जोमात सुरु आहे त्यामुळे पोलीस अधिक्षक यांनी गेवराई पोलीस ठाण्यात भेट देवुन कारवाई संदर्भांचा आढावा घ्यावा तसेच शहरात वाढत असलेल्या घरफोड्या चोऱ्या घटनांच्या तपासा बाबत आढावा घ्यावा अशी मागणी नागरीकातुन होत आहे.

## खुनाच्या आरोपातून आरोपीची जामीन मंजूर -ॲड.सचिन काळे

बीड । प्रतिनिधी डोक्यात दगड घालून जीव मारल्या च्या आरोपातून लिंबाजी कानडे याची जामीन मंजूर थोडक्यात माहिती अशी की दि.१४/११/२०२४ रोजी तुम्ही माझे घरी असताना मला माझी भाउजई ने फोन करून कळविले की तुमचा भाऊ मजहर याला कोणीतरी जीवे मारून टाकले आहे तुम्ही स्मशानभूमी जवळ मडगी येथील कच्च्यारोड वर लवकर या असे कळवल्याने मी माझ्या मोटरसायकलवर त्या ठिकाणी गेलो तिथे पोलीस व माझी भाऊजई व इतर बरेच लोक जमा झाले होते माझा भाऊ मजहर रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर मृत अवस्थेत पडलेला होता त्याच्या डोक्यातून तोंडातून नाकावाटे कानातून रक्त निघून जमिनीवर बरेच रक्त पडलेले दिसत होते त्याचे डोक्यावर कपाळावर डोळ्याजवळ बऱ्याच जखमा दिसत होत्या त्याच्य डोक्या जवळ व कंबरे जवळ दगडे पडलेली दिसत होती व त्या दगडाला रक्त लागलेले दिसत होते त्याच्या प्रेताच्या बाजूला थोड्या अंतरावर त्याची स्कुटी रस्त्यावर पडलेली दिसत होती पोलिसांनी पंचनामा करून त्याचे पप्रेत सरकारी दवाखाना बीड येथे पीएम करण्यासाठी घेऊन गेले माझ्या भावाचे गेले एका वर्षापासून एका महिलेशी अनैतिक संबंध होते माझ्या भावाचे सोबत असलेला अनैतिक संबंध बाबत मला व त्याच्या पत्नीला माझा भाचा मोसिन असे आम्हाला माहिती होते पोलिसांनी अनैतिक संबंध असलेले महिला व लिंबाजी कानडे राहणार वाक्नाथपुर बीड तालुका जिल्हा बीड यांना ताब्यात घेतले त्यांच्याकडे चौकशी चालू आहे तरी दिनांक १४/११/२०२४ सकाळी ११ वाजण्याच्या पर्वी मडकी मोंढा रोड बीड येथील नदीच्या पात्राच्या पश्चिम लागत असलेल्या कच्च्या रस्त्यावर सावता समाज मंदिराच्या समोर रस्त्यावर माझा भाऊ नामे सय्यद मजहर सय्यद अख्तर वय ४२ वर्ष राहणार हवेली तांदळवाडी तालुका यांचे प्रियसी व तिच्यासोबत असलेला लिंबाजी लक्ष्मन कानडे व अज्ञात लोकांनी त्यास अनैतिक संबंधातून दगडाने ठेचून जीवे ठार मारले अशी फिर्याद शहर पोलीस स्टेशन येथे दिली होती तरी त्यास गु.र.नं २७०/२४ कलम १०३,३ (५) बी.एन.एस नुसार गुन्हा नोंद झाला होता सदर आरोपीने न्याय मिळवण्यासाठी ॲड.सचिन काळे यांच्या वतीने माननीय जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला आरोपी यांचे विकिल यांनी केलेला बचाव व युक्तिवाद इत्यादी बाबी ग्राह्य ग्राह्य धरून मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला आरोपीच्या वतीने ॲड.सचिन काळे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.पवन नागरगोजे यांनी सहकार्य केले

## राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या मराठवाडा अध्यक्ष पदी अक्षय बांगर

**बीड । प्रतिनिधी बीड येथील सामाजिक कार्यकर्ते अक्षय बांगर यांची राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या मराठवाडा अध्यक्ष युवा आघाडी पदी तर बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी सुरज गवळी यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय ओबीसी फाउंडेशनच्या मराठवाडा अध्यक्ष युवा आघाडी तसेच जिल्हा उपाध्यक्ष पदाची धुरा त्यांच्याकडे सोपवण्यात येत आहे या निवडीमुळे समाजाच्या सर्व स्तरातून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहे. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष उमेश आनेराव राज्य प्रवक्ते द्वारकादास फटाले यांच्यासह यावेळी संघटनेचे सचिव उमेश आनेराव बार्शी, शंकर वानेगावकर नांदेड,संजय मोगरे नाशिक, महीला अध्यक्ष विजयालक्ष्मी आनेराव, तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हा पदाधिकार्यांनी या निवडीबद्ल अभिनंदनांचा वर्षाव केला.**

# बिघडलेली सामाजिक स्थिती बदलण्यासाठी गंगाई - बाबाजी सारख्या महोत्सवांची गरज -प्रा. सुरेश नवले



आष्टी । प्रतिनिधी नव्या पिढीच्या मनात चांगले विचार रुजविण्यासाठी तसेच बिघडलेली सामाजिक स्थिती बदलण्यासाठी गंगाई बाबाजी सारख्या महोत्सवांची गरज आहे असे प्रतिपादन मा. मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी केले. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर तालुक्याचे मा. आ. भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित गंगाई - बाबाजी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा मा. आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन समारंभास मा.आ. राजेंद्र जगताप, मा. आ. जनार्दन भाई तुपे, प्रा. आनंद हंबर्डे, ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव डॉ अजय दादा धोंडे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्रा. डॉ. हरिदास विधाते, बापूसाहेब भंडारी, अशोक साळवे, कबड्डीचे राष्ट्रीय खेळाडू श्रीमंत उबाळे, राजू काका धोंडे, ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. सुरेश नवले पुढे म्हणाले की, मायबापांना देवाचे स्वरूप देणारे मा. आ. भीमराव धोंडे हे आदर्श समाज निर्माण व्हावा म्हणून गंगाई - बाबाजी महोत्सवाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्र ही पुण्य भूमी आहे, वज्र भूमी आहे. महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी हजारो वारकरी आणि मावळे दरवर्षी घराबाहेर पडतात. त्यामुळेच या राज्यात महाराष्ट्र धर्म टिकून आहे. या महाराष्ट्रात ठीक ठिकाणी वेगवेगळे महोत्सव साजरे होतात परंतु आपल्या आई- वडिलांच्या नावाने होणारा आष्टीतील हा एकमेव महोत्सव आहे. गंगाई - बाबाजी महोत्सव हा साहित्यिक व सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे यु-टुब च्या माध्यमातून जतन करणे गरजेचे आहे

, असे ते म्हणाले.

# बहुचर्चित चित्रपट ग्लोबल आडगावला राज्य शासनाची चार नामांकने



### माजलगावचे भूमिपुत्र दिग्दर्शक डॉ.अनिलकुमार साळवे यांना उत्कृष्ट कथेसाठी नामांकन

माजलगांव-प्रतिनिधी साठाव्या राज्य चित्रपट पुरस्काराची नामांकने सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी घोषणा केली मराठवाड्याची निर्मिती असलेला बहुचर्चित चित्रपट ग्लोबल आडगाव या चित्रपटात चार नामांकने मिळाली. सन २०२२ या वर्षातील साठाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या अंतिम फेरीसाठी ग्लोबल आडगाव ची निवड झाली तर या चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक अनिल कुमार साळवे यांना सर्वोत्कृष्ट कथेसाठी नामांकन प्राप्त झाले. नामनिर्देशन विभागातील पुरस्कारांची नामांकने पुढीलप्रमाणे; सर्वोत्कृष्ट चित्रपट (ग्लोबल आडगाव),सर्वोत्कृष्ट कथा : डॉ.अनिलकुमार साळवे (ग्लोबल आडगाव), उत्कृष्ट गीते : प्रशांत मडपूवार (ग्लोबल आडगाव/गाणे - यल्गार होऊ दे), उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता : रोनक लांडगे (ग्लोबल आडगाव) अशा चार विभागात ग्लोबल आडगाव चित्रपटास नामांकने मिळाली आहेत. यापूर्वी ग्लोबल आडगाव या मनोज कदम निर्मित,अमृत मराठे सहनिर्मित आणि डॉ. अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित मराठी चित्रपटास न्यू जर्सी आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल अमेरिका सन्मान, न्यूलीन लंडन बेस्ट रायटर अवॉर्ड, इफ़्फी गोवा महोत्सवात महाराष्ट्र शासनाकडून निवड, कोलकाता फिल्म फेस्टिव्हल, अजंता-एलोरा फिल्म फेस्टिव्हल, पीफ फेस्टिव्हल, यशवंत फेस्टिव्हल मध्ये निवड होऊन अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत. ग्लोबल आडगाव हा बहु चर्चे चित्रपट लवकरच रुपेरी परद्यावरती झळकणार आहे अमेरिका दुबईसह महाराष्ट्रातील संपूर्ण चित्रपट ग्रहांमध्ये एप्रिल मे च्या दरम्यान प्रदर्शित होणार आहे या चित्रपटात सयाजी शिंदे, उषा नाडकर्णी,उपेंद्र लिमये, अनिल नगरकर,रौनक लांडगे,सिद्धी काळे,अशोक कानगुडे,अनिल राठोड,महेंद्र खिल्लारे,साहेबराव पाटील,डॉ. संजीवनी साळवे,डॉ. सिद्धार्थ तायडे, रानबा गायकवाड ,जितेंद्र शिरसाठ,विद्या जोशी,विष्णू भारती, डॉ. दिलीप वाघ, प्रदीप सोळंके, मधुकर कर्डक, नाना कर्डीले, व्यंकटेश कदम, फुलचंद नागटिळक, रामनाथ कातोरे, रणधीर, मोरे, सचिन गेवराईकर, आदित्य जालिंदर केरे, विक्रम त्रिभुवन, विष्णू चौधरी, माजिद खान, परमेश्वर कोकाटे, प्राजक्ता खिस्ते, ऋषिकेश आवाड मंगेश तुसे,आशीर्वाद नवघरे, सह अनेक कलावंतांनी भूमिका साकारल्या आहेत. डॉ. विनायक पवार,प्रशांत मडपुवार,डॉ. अनिलकुमार साळवे यांचे गीत लेखन असून जसराज जोशी,डॉ. गणेश चंदनशिवे,आदर्श शिंदे यांनी पार्श्वगायन केले आहे. संगीतकार विजय गावंडे यांनी गाणी संगीतबद्ध केली आहेत. सिनेमॅटोग्राफी गिरीश जांभळीकर, संकलन श्रीकांत चौधरी, ध्वनी आयोजन विकास खंदारे,निर्मिती व्यवस्था प्रशांत जठार, सागर पतंगे,कला दिग्दर्शन संदीप इनामके आदींनी तांत्रिक बाजू सांभाळली आहे.गणेश नारायण, डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी सहदिग्दर्शन केले आहे. मग्लोबल आडगावफया सिनेमांमधून शेती, माती, ग्रामसंस्कृती त्याचबरोबर ग्लोबलायझेशनच्या विळख्यात अडकलेला शेतकरी ,ग्लोबलायझेशन मुळे शेतीचे झालेले नुकसान अशा महत्त्वाच्या विषयावर या सिनेमाच्या माध्यमातून भाष्य करण्यात आलेले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार १ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



## सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्या सतिश जोगदंड यांची मागणी



चौसाळा । प्रतिनिधी बीड जिल्ह्यात नोंदणी केलेल्या एकूण सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ५० टक्के शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच उर्वरित ५० टक्के शेतकऱ्यांचे ३१ जानेवारीपर्यंत म्हणजेच केवळ दोन दिवसांत इतक्या कमी कालावधीत सोयाबीन खरेदी करणे शक्य नाही. त्यामूळे सोयाबीन खरेदीला २८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सतिश (भाऊ) जोगदंड यांनी केली आहे. सोयाबीन खरेदीच्या सुरुवातीला आद्रता आणि त्यानंतर बारदाना तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन घालता आलेले नाही. नोंदणीकृत शेतकऱ्याची एकूण संख्या आणि बाजारात भाव मिळत नसल्याने, हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा ओघ पाहता जास्तीत जास्त सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंत किमान एक महिन्याची सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सतिश (भाऊ ) जोगदंड यांनी केली आहे.

# लाडकी बहीण योजनेसाठी चुकीची माहिती देणाऱ्यांबाबत काय कारवाई करणार ?

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना जाहीर झाल्यापासूनच प्रचंड चर्चेत असून आत्तापर्यंत राज्यातील दोन कोटींहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेअंतर्गत पात्र ठरणा–या २१ ते ६० वयोगटातील महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. आत्तापर्यंत जुलै ते जानेवारी अशा ७ महिन्यांचे एकूण १० हजार ५०० रुपये पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. मात्र या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही महिलांनी चुकीची माहिती दिली, एवढेच नव्हे तर फक्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर बाहेरच राज्यातील, तसेच काही बांगलादेशी महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतल्याच्या बातम्या काही दिवसांपासून समोर येत आहेत. लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेण्यात आल्याची माहिती समोर येताच आता प्रशासन खडबडून जागं झालं असून आता यासंदर्भात महिला आणि





बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. ङ्ग चुकीची माहिती देवून लाभ घेणा–यांची चौकशी होणारफ अशी माहिती अदिती तटकरेंनी ट्विटमधून दिली आहे.द या सोशल मीडिया नेटवर्किंग साईटवरील अधिकृत अकाऊंटवर महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी यासंदर्भात एक ट्विट केलं आहे. अर्जदारांच्या छाननीबाबत सरकार सजग आहे, असंही त्यांनी नमूद केलं.काय आहे अदिती तटकरेंचं ट्विट ?मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर बनावट अर्जदारांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत एकदाही सन्मान निधी वितरित झाला नसून, सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.म हिला व बालविकास विभाग अर्जदारांच्या छाननीबाबत अत्यंत सजग असून कोणत्याही प्रकारची फसवणूक करणा–यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे, असं अदिती तटकरेंनी नमूद केलं आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात

## सौ.के.एस.के. काकु कृषि महाविद्यालच्या पंधरा विद्यार्थ्यांची पुण्याच्या नामांकित कंपनीमध्ये कॅम्पस मुलाखती द्वारे झाली

बीड : श्री अनंत कृषी विकास प्रतिष्ठान या संस्थेच्या सौ. के.एस.के काकू कृषि महाविद्यालय, बीड या ठिकाणी नुकतेच वेटरीना हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीच्या वतीने व्हेटर्नरी सेल्स ऑफिसर व सेल्स ऑफिसर या पदाकरिता महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी या कॅम्पस मुलाखतीचे आयोजन दिनांक ०९ जानेवारी २०२५, गुरुवार रोजी केले होते. मुलाखतीस उपस्थित विद्यार्थ्यांपैकी पंधरा विद्यार्थ्यांची निवड कंपनीमार्फत करण्यात आलेली आहे. ही कंपनी पशु आहार क्षेत्रामध्ये गरजेप्रमाणे आहारपूरक घटक बनवते, शेतकऱ्याना दुग्ध व्यवसाय फायदेशीर मार्गदर्शन करते तसेच वेटझोनच्या माध्यमातून, उत्पादने शेतकऱ्यांच्या दारात पोचवते. कंपनीच्या वतीने श्री अमित शिंदे, नॅशनल सेल्स ऑफिसर आणि श्री युवराज खरात, झोनल सेल्स ऑफिसर यांनी या मुलाखती घेतल्या होत्या. व्हेटर्नरी सेल्स ऑफिसर या पदाकरिता प्रदीप राठोड, सिद्धांत मोरे, प्रसाद कोकरे, आशीर्वाद चौधरी, वैभव बांगर, अविष्कार इंदुरे, रोहन चव्हाण, आशिष अलगट, ओंकार चव्हाण व ओंकार मसवडे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे तर सेल्स ऑफिसर या पदाकरिता सुरज गवारे, अभिषेक खाकरे, श्रीवत्स व आदेश यादव या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी व पालक यांनी समाधान व्यक्त केले. कृषि अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खासगी क्षेत्रासह सरकारी क्षेत्रातही रोजगाराच्या संधी शहरी व ग्रामीण भागातील युवकांसाठी उपलब्ध आहेत, त्यासाठी युवकांना कृषिविषयक शिक्षण आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. या महाविद्यालयामार्फत सातत्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास आणि सर्वांगीण विकासाकरिता नेहमीच प्रयत्न केले जातात. विविध कंपन्यांना लागणारी कुशलता विचारात घेऊन त्याबद्दलचे मार्गदर्शन केले जाते. याचा नेहमीच विद्यार्थ्यांना फायदा होतो. त्याचेच फलित म्हणजे या पंधरा विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखती मधून निवड झाली आहे असे प्रतिपादन संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांनी केले. तसेच कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत विविध क्षेत्रातील नोकरीसाठी कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले जाते. या कॅम्पस मुलाखतीचे नियोजन ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाचे प्रमुख डॉ. एस.टी. शिंदे यांनी केले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव मा. जयदत्तजी अण्णा क्षीरसागर यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केल

## कोरडे गणपती मंदिरात महागणेशयाग व महाप्रसाद



बीड । प्रतिनिधी दरवर्षीप्रमाणे बीड शहराचे ग्रामदैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळे गल्ली येथील श्री संस्थान कोरडे गणपती मंदिर या ठिकाणी आज ३१ जानेवारी शुक्रवार रोजी सामुदायिक महा गणेशयाग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच दिनांक १ फेब्रुवारी शनिवार रोजी श्रींची पारंपारिक मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे या दोन्ही कार्यक्रमासाठी भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे बीड शहरातील ग्रामदैवत म्हणून समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र कोरडे गणपती संस्थान दरवर्षी द्वार निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करत आहे यावर्षी देखील शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी रोजी सामुदायिक महा गणेशा याग आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या वेळेत श्रींची आरती करून महाप्रसाद आयोजित केला आहे तसेच दिनांक १ फेब्रुवारी रोजी प्रतिवर्षाप्रमाणे श्रींची पारंपरिक मिरवणूक शहरातून काढली जाणार आहे या मिरवणुकीसाठी दरवर्षी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात या वर्षी देखील भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे,श्रगणेशाची मिरवणूक काळे गल्ली, जुना बाजार, बलभीम चौक, कारंजा जुनी भाजी मंडई, कबाड गल्ली, माळीवेस, धोंडीपुरा मार्गे पुन्हा मंदिरात येऊन आरती केली जाणार आह

## वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत सुरु असलेल्या बांधकाम प्रकल्पांना गती द्यावी – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई : राज्यात वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत सुरू असलेले नियोजित बांधकाम प्रकल्पांना गती देण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असून कामांची गुणवत्ता राखून काम वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. मंत्रालयात वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत होणाऱ्या नियोजित बांधकामाचा व विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी मंत्री श्री. मुश्रीफ बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, आयुक्त राजीव निवतकर, संचालक अजय चंदनवाले उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी अमरावती व लातूर येथे होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे होणाऱ्या मानसिक आरोग्य केंद्राचे व वाशिम येथे होणाऱ्या सर ज.जी. रुग्णालय येथील मुलांचे वसतीगृह व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा आढावा घेतला. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, पालघर व हिंगणघाट येथील बांधकामासंदर्भात सद्य:स्थिती जाणून घेतली. हिंगोली, नाशिक, गडचिरोली, सांगली, मुंबई येथे होणाऱ्या नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासंदर्भात माहिती जाणून घेतली. त्याचबरोबर बैठकीत अर्थसंकल्पीय अधिवेशन-२०२५ मध्ये सादर होणाऱ्या पुरवणी मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी बैठकीत वाय फाय कॅम्पस प्रकल्प, हिमोग्लोबिन टेस्ट मिटीर अँड स्ट्रिप्स, सादरीकरण, बाबत उपस्थित असलेल्या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी सादरीकरण केले.

# पालकमंत्री असताना, एकही रूपयाचे काम न करता ७३.३६ कोटींचा घोटाळा

बीड जिल्ह्यातील परळी आणि अंबाजोगाई तालुक्यांमध्ये धनंजय मुंडे पालकमंत्री असताना अनेक बोगस बिलं उचलली गेली, असा धक्कादायक आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला आहे. परभणी / दत्तात्रय कराळे बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर बीडसह अख्या राज्यात कमालीचा असंतोष पसरला आहे. याच मुद्यांवरून राजकीय व सामाजिक वातावरण पूरते ढवळून निघालं असतानाच दुसरीकडे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीला विरोधकांकडून प्रचंड जोर धरला जात आहे. अशातच आता भाजप आमदार सुरेश धस यांनी एक पत्रकार परिषद घेत मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. धस यांनी मुंडे जिल्ह्याचे पालकमंत्री असताना परळी आणि अंबाजोगाईत काडीचंही काम न करता बिलं उचलली, असा घणाघाती आरोप केला आहे. अजित पवार यांना, अशी बिले उचलणाऱ्यांवर इतकं प्रेम करू नयेत, अशी विनंती धस यांनी केली आहे. सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे भाजप आमदार सुरेश धस चांगलेच आक्रमक झाले असून त्यांनी आता मात्र आपल्या निशान्यावर मंत्री धनंजय मुंडे यांना घेतले आहे. त्यांनी अनेकदा मबडा आकाफ आणि मछोटा आकाफ म्हणत मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. आता मुंडे यांच्यावर धस यांनी नव्याने काही आरोप केले आहेत. ज्यामध्ये त्यांनी परळी आणि अंबाजोगाई तालुक्यात महाविकास आघाडी सरकारच्या काळातील काळाबाजर बाहेर काढला आहे. तर या कालावधीत मुंडे हेच सामाजिक न्याय तथा बीडचे पालकमंत्री होते. त्यांच्या काळातच परळी आणि अंबाजोगाईत काम न करता बिलं उचलण्यात आल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी केला आहे. धस यांनी पत्रकार परिषदेत मुंडे यांनी आपले पालकमंत्रीपद भाड्याने दिलं होतं का, असा सवाल केला आहे. तर बीडमधील कार्यकारी अभियंता कोकणे यानी पिस्तूल मागितल्याचा किस्सा सांगतांना त्यावरुन विद्यमान मुख्यमंत्री आणि तत्कालीन विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात टिप्पणी केल्याची आठवण करुन दिली. विष्णू चाटेचे मतेफ ४६ कोटी एकाच रोडवर पाच वेळा बिल उचलले. सुरेश धसांनी नेमका प्रकार सांगून प्रचंड धक्कादायक असा बॉम्ब उडवून दिला. बीडच्या डीपीडीसी २०२१ ते २०२२ या कालावधीत पालकमंत्री धनंजय मुंडे होते. कोरोनाचा कालावधी. परळी आणि अंबेजोगाई येथे एका नव्या रूपयाचे काम झाले नाही. पण कोणतेही कामं न करता कोट्यवधी रुपयांची बिले उचलण्यात आली. सार्वजनिक बांधकाम



मंत्री धनंजय मुंडे यांनी केलेल्या ७३.३६ कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याचा भांडाफोड करतांना आ.धस हे पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधत आहेत.

उपविभाग अंबाजोगाईने २ कोटी ३१ लाख रुपयांचे बिल उचलले. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग बीड यांनी १० कोटी ९८ लाख, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबेजोगाई ६ कोटी ५९ लाख, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (जिल्हा परिषद) १६ कोटी ४८ लाख रुपये आणि कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (जिल्हा परिषद) बीड १ कोटी ३४ लाख रूपये उचलल्याची माहितीच धस यांनी पत्रकार परिषदेत उघड केली. जवळपास दोन वर्षांत बीडच्या परळी आणि अंबेजोगाई येथे ६३ कोटी रुपये हे बोगस कामांच्या माध्यमातून उचलण्यात आल्याची धक्कादायक माहिती धस यांनी जाहीर केली आहे. संजय मुंडे हे डेप्युटी इंजिनियर असताना त्यांना कार्यकारी अभियंता दाखवून २५ जून २०२२ रोजी त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम उपविभाग परळी येथील अभियंता विभागाचा प्रभारी कार्यभार देण्यात आल्याचा दावा धस यांनी केला आहे. याच संजय मुंडे यांनी मतीफ सर्व बिले उचलून दिली, असा दावाही धस यांनी केला आहे. नव्या पैशाचेही काम नाही केलं, पण...यावेळी धस यांनी या कारभारातील अनेक नावांचा उल्लेख करताना मोडस ऑपरेंडी कशी असते याचीही उकल करवून दिली. तर जिल्हाधिकारी पैसे जिल्हा परिषदेला डम्प करायचे आणि जिल्हापरिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला ते जमा होत असत. जे पैसे ३१ मार्च २५ जून २०२२ रोजी उचलले. एकाच दिवशी ३७ कोटी ७० लाख रुपये उचलले. मात्र एक रुपयाचेही काम करण्यात आले नाही, याचे आपल्याकडे पुरावे असून त्याची पीडीएफच पत्रकारांना दिली. ती माहिती पत्रकारांनी प्रसिद्ध करावी. जेणेकरून जिल्ह्यातील सूज्ञ नागरीकांना तरी कळावे. आपल्या पैसांचे नेमकं होतंय तरी काय, हे सुद्धा समजले पाहिजे, असं ते म्हणाले. डीपीडीसीतून केला ७३ कोटी ३६ लाखांचा घपला डीपीडीसी जिल्हाधिकारी बीड यांनी २५ मार्च २०२० रोजी परळी मतदारसंघातील ५७ कामाच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आल्या होत्या. तरीही त्या कामांचे सुध्दा एकूण १४ कोटी ४३ लाख ४५ हजाराचे बिल उचलून मोकळे झाले. प्रशासकीय मान्यता रद्द केलेली असताना हे पैसे उचलले. हा गंभीर गुन्हा आहे.परळी मतदारसंघात २०२१ ते २०२३ पर्यंत मविआ सरकार असतानाच्या काळातपहिला कट्टा ३७ कोटी ७० लाखांचा, दुसरा कट्टा १४ कोटी ४६ लाख आणि तिसऱ्यांदा १६ कोटी २० लाखांची बोगस बिले उचलण्यात आली. तर चौथ्यांदा ५ कोटी असे एकूण ७३ कोटी ३६ लाखांची बोगस बिलं दाखवून बेधडक पैशांची उचल करण्यात आल्याचा रोकडा आरोप धस यांनी केला आहे. एकूणच काय तर धनंजय मुंडे यांनी पालकमंत्री पदाचा गैरवापर करुन कायद्याची पायमल्ली तर केली आहेच, त्याशिवाय ते ज्या सरकारमध्ये कार्यरत होते, त्या सरकारच्या डोळ्यातही धूळफेक करत त्यांनी जनतेचीही घोर फसवणूक केली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे मुंडेसारख्या एका जबाबदार मंत्र्याने एवढा मोठा आर्थिक घोटाळा करुनही ईडीने याची साधी दखलही घेतलेली नाही, ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. दरम्यान, उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री असलेल्या अजित पवारांनी एवढे सारे पुरावे असूनही मुंडे यांची पाठराखण करणे म्हणजे निश्चितच मदाल में कुच्छ काला है, म्हणण्यापेक्षा अख्खी दाळच काळी असल्याचे दिसून येत आहेफ, असं म्हटलं तर चुकीचं ठरु नये. आपल्या पक्षाचा मंत्री म्हणून पवार यांनी हे प्रकरण कितीही दुर्लक्षित केलं तरी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तरी तसा डोळेझाकपणा न करता धाडशी कारवाई करुन हे सरकार पारदर्शक कारभार करणारे असल्याचे दाखवून द्यावे. अन्यथा पवारांबरोबर मुख्यमंत्री सुध्दा यात सहभागी आहेत, असेच जनतेला वाटल्यावाचून राहणार नाही एवढे निश्चित..!

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com